**MHST0500 0454 2017**

**विशेष दरखास्त क्र.९/२०१७**
**धनवृध्दी नागरी पतसंस्था**
**वि.**
**१. सागर महादेव तुपे व इतर**

**धनकोतर्फे विधीज्ञ – श्री. एच. जी. ताटे.**
**ऋणकोतर्फे विधीज्ञ – श्रीमती सी. एल. चव्हाण**

## निशाणी ६४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज ऋणको यांनी अर्जात नमुद कारणांचा विचार करता अर्जात नमूद रक्कम न्यायालयात जमा करणेस परवानगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील धनको यांचे विधीज्ञ यांनी स्वहस्ताक्षरात दिलेले म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

०३. मूळ दरखास्त अर्ज पाहिला असता असे दिसून येते की, धनको यांनी ऋणको यांच्याविरूध्द मूळ दरखास्त अर्ज ऋणको यांचेकडून रक्कम रू.७,५२,६७७/– ही रक्कम व ती रक्कम वसूल होईपावेतो पुढील व्याज वसूल होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. त्यामध्ये नोटीस प्राप्त झाल्यानंतर ऋणको क्र.१ हे न्यायालयात हजर झालेले आहेत. त्यांनी यापूर्वी वेळोवेळी देणे असलेली रक्कम अंशत: भरलेली आहे. तसा युक्तीवाद ऋणकोंच्या विधीज्ञांनी केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये अथवा धनकोच्या विधीज्ञांनी ऋणको यांनी नेमकी किती रक्कम अदा केली व किती रक्कम अदा करणे बाकी आहे याबाबत स्पष्ट रक्कम नमूद केलेली नाही. मूळ दरखास्त ही रक्कम वसूल करणेसाठीच दाखल केलेली असल्याने जर ऋणको आज काही रक्कम भरत असेल व ती भरून घेण्यास परवानगी दिली गेल्यास धनको यांचे कोणतेही नुकसान होणार नाही किंबहुना रक्कम वसूल होणेसाठी मदतच होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज (निशाणी क्र. ६४) चा अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. ऋणको क्र.१ यांस अर्जात नमूद केलेली रक्कम रू.१५,०००/–(पंधरा हजार फक्त) धनको यांचे प्रतिनीधी न्यायालयात हजर असल्यास त्यांना ते घेण्यास तयार असल्यास त्यांना सरळ देण्यास व ते हजर नसल्यास नमूद रक्कम न्यायालयात जमा करण्यास परवानगी देण्यात येत आहे. धनको अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी पैसे स्वीकारल्यास तशी पोहोच त्यांनी ऋणको क्र.१ यांना द्यावी.

३. ऋणको यांना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी उर्वरीत रक्कम भरणेसाठी पुढील तारखांना आवश्यक ती तजवीज करावी.

SUDHIR BALASAHEB TODKAR
Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2026.02.06 12:05:33 +0530

ठिकाण : कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः ०६/०२/२०२६ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.